# संस्कृत वक्तृत्व स्पर्धेत अमृता करंबळेकर प्रथम

चाणक्य मंडल परिवारातर्फे आयोजित राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धा नुकतीच पार पडली. या स्पर्धेतील संस्कृत वक्तृत्व स्पर्धेत टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत आणि भारतीयविद्या अध्ययन केंद्राच्या संस्कृत पारंगत प्रथम वर्षातील विद्यार्थिनी अमृता करंबळेकर हिने प्रथम क्रमांक पटकावला आहे.

चाणक्य मंडल परिवारातर्फे आयोजित राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्यात चाणक्य मंडल परिवाराचे संस्थापक व माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांच्या हस्ते अमृता करंबेळकर हिला सन्मानित करण्यात येणार आहे. करंडक व १५ हजार रुपये असे पारितोषिकाचे स्वरुप आहे. स्पर्धेचा 'प्रजातन्त्रस्य जननीत: विश्वमित्रपर्यन्तं भारतदेश' हा विषय होता. स्पर्धा विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला चालना देण्यासाठी आणि प्रभावी वक्तृत्वकौशल्य विकसित करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात येते.स्पर्धेतील अमृता करंबेळकर हिच्या यशाबद्दल टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती डॉ. दीपक टिळक व कुलगुरु डॉ. गीताली टिळक यांनी अभिनंदन केले.

मराठी वक्तृत्व स्पर्धेतील 'भारत ऽ २०४७' या विषयात प्रथम क्रमांक छत्रपती संभाजी नगर येथील देवगिरी महाविद्यालयाचा अथर्व पळसकर, द्वितीय पुण्यातील नवलमल फिरोदिया विधी महाविद्यालयाची सनंता तुळजापूरकर व

तृतीय क्रमांक एआयएसएसएमएस अभियांत्रिकी महाविद्यालयाची वैष्णवी पाटील यांनी पटकावला. संस्कृत वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय क्रमांक कराड येथील कृषी महाविद्यालयाच्या गौरी ठोंबरे यांनी तर वादविवाद स्पर्धेत ऐश्वर्या वाबळे आणि सानिका पाटील यांनी मिळविला. समान नागरी कायदाः राष्ट्रीय एकात्मतेसाठी पाऊल की, विविधतेला धोका? हा विषय होता.

